नवी मुंबई महानगरपालिका परिवहन समितीचा नवीन २५० स्टेनलस स्टीलचे बस निवारा थांबे बी.ओ.टी. (बांधा, वापरा, हस्तांतरीत करा) तत्वावर बांधणे व जाहिरातीचे हक्क देणेसंदर्भातील दि.३१.०५.२०१९ रोजीचा ठराव क्र.११९, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (१)अन्वये प्रथमत: निलंबित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- नमुंम-१२१९/प्र.क्र.६४/नवि-२८
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १३ सप्टेंबर, २०१९

संदर्भ:- १) नवी मुंबई महानगरपालिका परिवहन समिती ठराव क्र.११९, दि.३१.०५.२०१९.
२) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. नमुंमपा/परि/शेल्टर/५०/२०१९, दि.०४.०६.२०१९.

प्रस्तावना:-

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या १८३ बस शेल्टरचा सन २००७ ते २०१८ या कालावधीसाठी दिलेला कंत्राट कालावधी संपलेला असून, सदर शेल्टर्स जीर्ण होऊन मोडकळीस आले आहेत. सद्यस्थितीत परिवहन उपक्रमास यापासून महिन्याला साधारणत: रु.१.५ लाख उत्पन्न मिळते. सदर उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाने **नवीन २५० स्टेनलस स्टीलचे बस निवारा थांबे बी.ओ.टी. (बांधा, वापरा, हस्तांतरीत करा) तत्वावर बांधणे व जाहिरातीचे हक्क देणे याबाबतची निविदा प्रक्रिया राबविली. सदर निविदा प्रक्रियेमध्ये** मे.प्रोॲक्टीव्ह इन ॲन्ड आऊट ॲडव्हरटायजिंग प्रा.लि. या उच्चतम दर (H१) सादर करणाऱ्या निविदाकाराची निविदा अंतिम करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-७३ (क) व कलम-७५ नुसार परिवहन समितीस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला. महानगरपालिकेच्या परिवहन समितीने दि.३१.०५.२०१९ रोजी ठराव क्र.११९ अन्वये सदर प्रस्ताव बहुमताने नामंजूर केला व संबंधितांना फेरनिविदा प्रक्रिया राबविण्याच्या सूचना दिल्या.

२. सदर ठराव हा परिवहन उपक्रमाच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ अन्वये विखंडीत करण्याची विनंती आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.०४.०६.२०१९ च्या पत्रान्वये शासनास केली असून, सदर पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की,

(२.१) परिवहन समितीच्या ठराव क्र.११९ च्या अनुषंगाने फेरनिविदा प्रक्रिया राबविल्यास ती वेळखाऊ ठरेल तसेच त्यामध्ये खूप कालापव्यय होणार आहे. यापूर्वीच्या अनुभवावरून निविदेस लगेचच प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी आहे.

(२.२) फेरनिविदा प्रक्रिया राबविल्यास सध्याच्या प्राप्त दरापेक्षा अधिक दर प्राप्त होईल याची खात्री देता येणार नाही.

(२.३) नवीन निविदा अंतिम होत नसल्यामुळे कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ देणे अपरिहार्य होत असल्याने पुर्वीच्या अत्यल्प दराने महसूल प्राप्त होत आहे यामुळे परिवहन **उपक्रमाचे** आर्थिक नुकसान होत आहे.

(२.४) सध्या अस्तित्वात असलेले बस शेल्टर्स हे १० ते १२ वर्षापूर्वी बांधण्यात आलेले असून ते जीर्ण होऊन मोडकळीस आलेले आहेत. फेरनिविदा प्रक्रियेस विलंब झाल्यास बस प्रवाश्यांची गैरसोय होऊ शकते.

(२.५) नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम हा **मासिक ५ कोटी रुपये तोट्यात चालत असून**, नवीन निविदा मंजूर झाल्यास महसुलात वाढ होऊन उपक्रमाचा तोटा काही अंशी कमी होईल. यास्तव प्रस्तुत निविदा प्रक्रियेस मान्यता मिळणे गरजेचे आहे.

(२.६) **परिवहन उपक्रमाने सदर निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने १५ वर्षे कालावधीसाठी अंदाजित केलेल्या रक्कमेपेक्षा ३२% जास्त रक्कम परिवहन उपक्रमाला प्राप्त होणार आहे.**

(२.७) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बी.ओ.टी. तत्वावर बस निवारा थांबे बांधल्याने प्रवाशांची सोय होणार आहे.

३. उपरोक्त बाबी विचारात घेता, नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन समितीने दि.३१.०५.२०१९ रोजी पारीत केलेला ठराव क्र.११९ हा महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या आर्थिक हिताविरुद्ध असल्याचे दिसून येत असल्याने, सदर ठराव निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा "**नवीन २५० स्टेनलस स्टील चे बस निवारा थांबे बी.ओ.टी. (बांधा, वापरा, हस्तांतरीत करा) तत्वावर बांधणे व जाहिरातीचे हक्क देण्याबाबतचा**" प्रस्ताव नामंजूर करण्याचा परिवहन समितीने पारित केलेला ठराव क्र.११९, दि.३१.०५.२०१९ हा महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आर्थिक हिताच्या विरुद्ध असल्याने, शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करून, अंतिमत: विखंडीत करण्यापूर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (१) अन्वये प्रथमत: निलंबित करण्यात येत आहे.

२. सदर ठरावाच्या निलंबनाच्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत संबंधितांनी अभिवेदन सादर करावे. सदर अभिवेदन विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (३) नुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१३१६४३४९३०२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2019.09.13 20:14:35 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) महापौर, नवी मुंबई महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
३) सभापती, परिवहन समिती, नवी मुंबई महानगरपालिका, जि.ठाणे
४) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
५) परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम, जि.ठाणे
६) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) निवडनस्ती (नवि-२८).